लोकमत

# दौंडला पाच लाखांची पर्स लंपास करणाऱ्या दोघांना केली अटक

## रेल्वे पोलिसांची कारवाई : पाच लाखांचा ऐवज केला हस्तगत

लोकमत न्यूज नेटवर्क

**दौंड :** दौंड रेल्वे स्थानकातून सोन्यासह हिऱ्यांचे दागिने आणि रोख रक्कम असा पाच लाख बारा हजार रुपयांची पर्स लंपास करणाऱ्या चोरट्यांना चोवीस तासांच्या आत सिनेस्टाइलने रेल्वे पोलिसांनी जेरबंद केले असल्याची माहिती दौंड रेल्वे पोलिस स्टेशनचे ठाणे अंमलदार नवनाथ पवार यांनी दिली.



पाच लाखांची पर्स चोरणाऱ्या आरोपींना पोलिसांनी अटक केली.

याप्रकरणी विकी रणसिंग, तुषार जाधव (दोघेही राहणार दौंड) यांना अटक करण्यात आली आहे, तर सीमा जितेंद्र बजाज (रा. आदर्श कॉलनी, लातूर) या प्रवासी महिलेने पोलिसांना फिर्याद दिली आहे. लातूरवरून मुंबईला निघालेली प्रवासी गाडी मंगळवारी पहाटेच्या सुमारास दौंड रेल्वे स्थानकात आली. यावेळी दोन अनोळखी चोरटे वातानुकूलित डब्यात गेले. दरम्यान डब्यात बर्थवर झोपलेल्या एका महिलेच्या उशा खालून पर्स ओढून दोघांनी पोबारा केला सदरची महिला आरडाओरडा करीत डब्याच्या दरवाजाजवळ आली असता गाडी सुरू झाली. या घटनेची माहिती दौंड रेल्वे पोलिसांना कळविण्यात आली. त्यानुसार पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेज बघितले आणि त्यांना सीसीटीव्ही फुटेजमध्ये दोन संशयित चोरटे दिसले. या प्रकरणाचा शोध घेत असताना सायंकाळच्या सुमारास रेल्वे पोलिसांना गुप्त बातमीदाराकडून मिळालेल्या माहितीनुसार एक आरोपी डिफेन्स कॉलनीतील एका झाडाखाली बसलेला आहे.

पोलिस हवालदार नरेंद्र पवार, आनंद वाघमारे, धनंजय वीर घटनास्थळी गेले असता पोलिसांना पाहून आरोपी पळायला लागला. यावेळी या आरोपीचा पोलिसांनी सिनेस्टाइल पाठलाग करून आरोपीला पकडले. यावेळी आरोपींनी पोलिसांशी झटापट केली. या झटापटीत एका पोलिसाच्या हाताला मार लागलेला आहे. पोलिसांनी आरोपीला पकडले आणि त्यानंतर दुसऱ्या आरोपीचे नाव समजले. दोन्ही आरोपींना अटक करण्यात आली आहे. रेल्वे पोलिस अधीक्षक तुषार दोशी, अपर पोलिस अधीक्षक रोहिदास पवार, उपविभागीय पोलिस अधिकारी मनोज यादव, पोलिस निरीक्षक इरफान शेख, पोलिस निरीक्षक राजेंद्र गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली या गुन्ह्याचा तपास चोवीस तासांच्या आत आनंद वाघमारे, धनंजय वीर, रूपेश पवार, नरेंद्र पवार यांनी तपास उघडकीस आणला आहे.